## उपमुख्यमंत्री अजितदादा : बीडच्या कलावंत व रसिकांना पावले!

# यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासाठी ८ कोटी १९ लाखांचा निधी मंजूर

### बीडकरांच्या सातत्यपूर्ण पाठ पुराव्याला यश-डॉ.गणेश ढवळे





बीड । दिव्य वार्ता ।

बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरुस्ती व नूतनीकरणासाठी पालकमंत्री अजितदादा पवार यांनी तब्बल ८ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, नववर्षाच्या सुरुवातीलाच बीडच्या कलावंत व रसिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. एप्रिल २०२५ मध्ये नाट्यगृहात पार पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या युवक मेळाव्यानंतर नाट्यगृहातील गंभीर दुरवस्था समोर आली होती. तुटलेल्या काचा, मोडलेल्या खुर्च्या, मेकअप रूममधील अपुरी विद्युत व्यवस्था, स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था अशा अनेक समस्या या वेळी निर्दर्शनास आल्या.

या बाबी आमदार विजय सिंह पंडित तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व संयोजक बळीराम गवते यांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या निर्दर्शनास आणून दिल्या होत्या.

या वेळी अजितदादांनी नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी निधी देण्याचे आश्वासन दिले होते. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त आयोजित जाहीर सभेत शासन आदेश दाखवत त्यांनी निधी मंजूर झाल्याची अधिकृत घोषणा केली. या निर्णयाचे नाट्यगृह बचाव समिती, सामाजिक कार्यकर्ते तसेच शहरातील नाट्यकलावंतांनी स्वागत करत पालकमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत. नाट्यगृहाच्या प्रश्नाला सातत्याने शासन दरबारी वाचा फोडणाऱ्या प्रसारमाध्यमांचेही डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी विशेष आभार मानले आहेत.

#### राजकीय पुढाऱ्यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा

नाट्यगृह दुरुस्तीसाठी निधी मिळावा यासाठी योगेश क्षीरसागर यांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे, तर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळुक व आनिलदादा जगताप यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता.

#### नाट्यगृह बचाव समितीच्या आंदोलनाला यश

नाट्यगृह बचाव समितीचे सतिश साळुंखे व प्रतिक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दि. १३ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते. तातडीने निधी न दिल्यास नाट्यगृहाला कुलूप ठोकण्याचा इशारा देण्यात आला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्याधिकारी नीत अंधारे यांनी तात्पुरत्या स्वरूपात १० लाख रुपयांची तरतूद केली होती.

#### सामाजिक कार्यकर्त्यांचा ठोस आवाज

नाट्यगृहाच्या कायमस्वरूपी दुरुस्तीसाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली दि. २४ फेब्रुवारी रोजी नाट्यगृह परिसरात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात बीडमधील अनेक नाट्यकलावंत सहभागी झाले होते.

#### प्रसारमाध्यमांचा सिंहाचा वाटा

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरवस्थेबाबत विविध दैनिके व माध्यमांनी सातत्याने बातम्या प्रसिद्ध करून शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यामुळेच नाट्यगृहाला मोठ्या प्रमाणात निधी मिळण्यात प्रसारमाध्यमांचा सिंहाचा वाटा असल्याचे मत डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.

## कालिकादेवी विद्यालयाल, 'विज्ञान प्रदर्शनात' तालुक्यातून प्रथम...



शिरूर कासार, (दिव्य न्युज) : 'गटशिक्षणाधिकारी कार्यालय' शिरूर (का.)व कै.सुभद्राबाई माध्यमिक विद्यालय, तागडगाव, ता.शिरूर (का.)यांच्या संयुक्त विद्यमाने ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन-२०२६ हे विज्ञान प्रदर्शन दिनांक ३१ डिसेंबर २०२५ ते दि.०२ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आले होते.या 'बाल विज्ञान प्रदर्शनात' कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब,यांच्या मार्गदर्शनाखाली, विद्यार्थी व शिक्षक यांनी तीन दिवस असणार्या ५३ व्या विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवला होता.इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या माध्यमिक गटातून विद्यालयाचा विद्यार्थी चि.शोएब शौकत आतार या विद्यार्थ्याने,बहुउद्देशीय सौर रस्ता क्लीनर म्हणजेच सौर उर्जेवर चालणारे एक आधुनिक उपकरण बनवून विज्ञान प्रदर्शात सादर केले.या बहुउद्देशीय यंत्राचे तसेच नव्या कौशल्याचे वेगळेपण अधोरेखीत झाले आहे.त्याच्या वेगळेपणामुळेच विद्यालयाचा तालुक्यातून 'प्रथम क्रमांक'आला आहे.तसेच विज्ञान प्रदर्शनात 'विज्ञान प्रश्नमंजुषा परीक्षा' घेण्यात आली होती,या परीक्षेत कु.आराध्या गीते, कु.श्रावणी मोरे व कु.समृद्धी तुपे या विद्यार्थिनींने 'विशेष प्राविण्य' मिळविले आहे.यामध्ये विज्ञान शिक्षक प्रा.सुनील मोरे व श्री वसंत आहेर यांच्या कल्पकतेमुळे व योग्य मार्गदर्शनामुळेच तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विद्यालयाला प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे.हा पुरस्कार शिक्षणविस्तार अधिकारी मा.शेख जमीर साहेब, गटशिक्षणाधिकारी मा.प्रशांत शिंदे साहेब,केंद्रप्रमुख मा.संभाजी सोनवणे साहेब व परीक्षक श्री मुळे सर यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.कालिकादेवी विद्यालयाला मिळालेल्या या दोन पुरस्कारामुळे,आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री मा.जयदत्त (अण्णा)क्षीरसागर साहेब,मा.रोहित (भैया) क्षीरसागर,प्रशासकीय अधिकारी डॉ.राजु मचाले साहेब, सहाय्यक प्रशासन अधिकारी मा.योगेश पवार सर, मा.एम.ए.राऊत सर,प्राचार्य केशव भांगे साहेब,उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा.संजय काकडे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे व सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व विद्यार्थ्यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आहे.

## मिल्लीया महाविद्यालयाच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



बीड (दिव्य न्युज) : येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयाच्या वतीने दिनांक ०३ जानेवारी २०२६ शनीवार रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागातर्फे तेरवी लाईन विभागातील गरीब कुटुंबातील मुला- मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत म्हणून पुस्तके, वह्या, पेन- पेन्सिल इत्यादी देण्यात आले. समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सय्यद तनवीर व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहम्मद इलयास फाजील यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.

## कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांची जयंती साजरी



शिरूर कासार, (दिव्य न्युज) : दि.०३ जानेवारी २०२६ शनिवार रोजी कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर (का.) जि. बीड येथे 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, पर्यवेक्षक जनार्दन काळे यांच्या हस्ते, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विज्ञान विभाग प्रमुख प्रा.संजय काकडे,प्रा.महारूद्र डोंगरे,परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे,सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आत्माराम झिंजुर्डे, प्रा.नारायण घोलप, प्रा.अशोक इनकर,प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.अनिल जरे, प्रा.दत्ता शिंदे,प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.महादेव हांगे,प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे,प्रा.लक्ष्मण गव्हाणे, डॉ.सत्यनारायण ढवळे, प्रा.सुनिल मोरे,प्रा.दत्ता गायकवाड,प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा. शशिकांत जावळे,डॉ.अशोक घोडके,प्रा.अशोक सवासे,प्रा.विनोद गलांडे,प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे,प्रा.अक्षय रणखांब, प्रा.अमर खोले,प्रा.सविता दराडे,प्रा.रेखा निर्मळ,सौ.अनिता लाटे,रविंद्र बडे, बाळासाहेब येवले,वसंत आहेर, जयेंद्र निकम, राजू बडे,आप्पासाहेब कांबळे, प्रशांत राऊत,नितीन बहिर,रोहित शिराळे,आदिनाथ काशिद,सुनिल खेडकर,विलास कांबळे,गौतम भोसले आणि विद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी,'सावित्रीबाई फुले' यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून विनम्र अभिवादन केले.

## कडेकडेने चालायचे कसे? सर्वत्र अतिक्रमणे, रस्त्यावरच पार्किंग!

### बीड शहरात पादचाऱ्यांचा जीव धोक्यात; फुटपाथच नाहीत, नगरपालिकेसह प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड । दिव्य वार्ता ।

शहरातील मुख्य रस्ते आणि बाजारपेठांमध्ये सध्या अतिक्रमणे आणि अस्ताव्यस्त पार्किंगने गंभीर रूप धारण केले आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या छोट्या-मोठ्या विक्रेत्यांनी आधीच जागा व्यापली असून, उरल्यासुरल्या जागेत वाहने उभी केली जात आहेत. यामुळे 'पादचाऱ्यांनी चालावे कुठून?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.बीड शहरातील सुभाष रोड, कारंजा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड, जालना रोड, बार्शी नाका, बशीरगंज यांसारख्या प्रमुख भागांत फळविक्रेते, हातगाड्यावाल्यांनी रस्त्यांचा ताबा घेतला आहे. यामुळे रस्ते अरुंद झाले असून, वाहनधारकांसह पादचाऱ्यांची मोठी कोंडी होत आहे. त्यातच शहरातील भाजीमंडईत तर सकाळी ७ ते ९ या वेळेत वाहतूकीची कोंडी झालेली असते. एकाच रस्त्यावर शाळेत जाणारे विद्यार्थी, भाजी विक्रेते, नागरिक, रिक्षाचालक, भाजी विक्रेते, अशी गर्दी असते. हातगाडे चालकही रस्त्यावर आलेले असतात त्यामुळे वाहतुक ठप्प होते



#### जाहिरात फलक लावून अडवला रस्ता

शहरात पादचाऱ्यांसाठी फुटपाथ असणे आवश्यक असताना, बीडमध्ये मात्र फुटपाथ अस्तित्वातच नाहीत. जिथे आहेत, तिथे दुकानदारांनी आपले सामान मांडले आहे किंवा जाहिरात फलक लावून रस्ता अडवला आहे.

#### पादचाऱ्यांचा जीव धोक्यात

रस्त्यावरून चालताना पादचाऱ्यांना वाहनांच्या गर्दीतून जावे लागते. अनेकदा मागून येणाऱ्या वाहनांच्या धडकेने अपघात घडतात. विशेषतः वृद्ध आणि लहान मुलांसाठी रस्त्यावरून चालणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे.

#### दंड आणि कारवाईची काय तरतूद?

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईची तरतूद आहे. विनापरवाना अतिक्रमण करणाऱ्यांवर नगर परिषद आणि अनधिकृत पार्किंगवर वाहतूक पोलीस कारवाई करू शकतात. मात्र, ही कारवाई केवळ नावापुरतीच उरल्याचे चित्र आहे.

#### जागा दिसली की लगेच पार्किंग

शहरात अधिकृत पार्किंग प्लाझा नसल्याचा फटका वाहतुकीला बसत आहे. नो पार्किंग चे फलक असूनही नागरिक रस्त्यावरच दुचाकी आणि चारचाकी वाहने उभी करतात. एखादी रिकामी जागा दिसली की तिथे अनधिकृत पार्किंगचा अड्डा तयार होतो.

#### कडेकडेने चालायचीही सोय राहिली नाही!

१ रस्त्याच्या अगदी कडेने चालण्याचा प्रयत्न केल्यास तिथे साचलेला कचरा, अस्ताव्यस्त लावलेल्या गाड्या किंवा दुकानदारांचे अतिक्रमण आडवे येते.


२ रस्ते केवळ वाहनांसाठीच आहेत का? असा प्रश्न सामान्य बीडकर विचारत आहेत.

"शहरातील वाहतूककोंडी सोडवण्यासाठी आमचे प्रयत्न सुरूच आहेत. रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभी करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. तसेच, नगर परिषदेच्या मदतीने अतिक्रमणे हटविले जात आहेत. नागरिक, वाहनधारकांनीही सहकार्य करावे.

-सुभाष सानप,
सहायक पोलिस निरीक्षक,
वाहतूक शाखा बीड

## पोलिस उन्नती दिन ... मुख्यालयावर संचलन ....





बीड : पोलिस उन्नती दिनानिमित्त बीडमध्ये जिल्हा पोलिस दलाच्या वतीने शुक्रवारी विविध कार्यक्रम घेण्यात आले. पोलिस मुख्यालयावर सकाळी पथसंचलन झाले. त्यानंतर श्वानपथकाने प्रात्यक्षिके सादर केली. विविध शस्त्रांचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले. तेथे विद्यार्थ्यांना त्याची माहितीही देण्यात आली. पोलिस अधीक नवनीत काँवत, अपर पोलिस अधीक्षक सनि पांडकर, चेतन तिडके यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# ७३ कोटींचा भूसंपादन घोटाळा : तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठकांची तासभर चौकशी; सह्यांचे नमुने घेतले

## नोटीस दिल्यावर हजर : दोन दिवसांनंतर जबाब नोंदवणार

बीड । दिव्य वार्ता ।

राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला वाढवून देण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या नावाने बनावट आदेश तयार करून शासनाची ७३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तपासाला वेग आला आहे. शुक्रवारी अविनाश पाठक यांना बीडच्या पोलिस अधीक्षक कार्यालयात नोटिस देऊन चौकशीसाठी पाचारण केले होते. जवळपास एक तास चाललेल्या या प्रक्रियेत पोलिसांनी त्यांच्या सह्यांचे नमुने घेतले असून, येत्या दोन दिवसांत त्यांचा सविस्तर जबाब नोंदवला जाणार आहे.



### काय आहे प्रकरण?

अविनाश पाठक हे २२ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी पदावरून बदलून गेल्यानंतरही, त्यांच्या कार्यकाळातील मागच्या तारखा (१ मार्च ते १७ एप्रिल २०२५) वापरून बनावट आदेश काढण्यात आले.

- या आदेशांद्वारे १५४ प्रकरणांमधील वाढीव मोबदला तब्बल २४१ कोटी ६२ लाख रुपयांनी वाढवण्यात आला.
- धक्कादायक म्हणजे, यातील ७३ कोटी ४ लाख रुपयांचे वाटपही संबंधित खातेदारांना करण्यात आले आहे.
- या प्रक्रियेत कोणतीही अधिकृत नोंदवही ठेवण्यात आली नव्हती.

### पुराव्यांची जुळवाजुळव

पोलिस उपअधीक्षक पूजा पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आतापर्यंत १२२ शेतकऱ्यांचे जबाब नोंदवले आहेत. आरोपींच्या मोबाइलमधील कॉल रेकॉर्डिंग आणि आवाजाचे नमुनेही तपासले जात आहेत. पाठक यांच्या सह्यांचे नमुने घेतल्यामुळे आता बनावट आदेशांवरील सह्या आणि मूळ सह्यांची पडताळणी केली जाणार आहे.

### तिघांना अटक, तर तीन वकिलांना १५ जानेवारीपर्यंत दिलासा

या घोटाळ्यात महसूल कर्मचारी आणि वकिलांसह एकूण दहाजणांवर शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. संजय हांगे (सहायक महसूल अधिकारी), त्र्यंबक पिंगळे (कंत्राटी कर्मचारी), शेख अजहर शेख बाबू (कंत्राटी कर्मचारी) हे अटक आहेत. ॲड. नन्नवरे, ॲड. पिसुरे, ॲड. प्रवीण राख आणि ॲड. नरवाडकर यांना १५ जानेवारीपर्यंत अटकेपासून दिलासा मिळाला आहे, तर पांडुरंग पाटील, राऊत आणि अविनाश चव्हाण हे फरार असून, त्यांचा शोध सुरू आहे.




"तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या सह्यांचे नमुने घेतले आहेत. पुढील दोन दिवसांत त्यांचा सविस्तर जबाब नोंदवला जाईल. प्रकरणाची व्याप्ती वाढत असली तरी तपासाला गती दिली जात आहे. यापूर्वीच शेतकरी आणि संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचे जबाब घेण्यात आले असून, आरोपींच्या आवाजाचे नमुनेही गोळा करण्यात आले आहेत.

–पूजा पवार, पोलिस उपअधीक्षक, बीड

# ३० दिवसांत खर्चाचा हिशोब द्या, नसता ६ वर्षे निवडणूक बंदी

### ६३ उमेदवारांचा खर्च सादर : उर्वरितांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नोटिसा

बीड, (दिव्य न्युज) : बीड नगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर आता सर्व उमेदवारांना निवडणूक आयोगाच्या नियमानुसार खर्चाचा तपशील सादर करण्याचे वेध लागले आहेत. निकाल लागल्यापासून ३० दिवसांच्या आत प्रत्येक प्रचार सभेचा फोटो, बिले आणि यादीसह संपूर्ण अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. हा हिशोब सादर न करणाऱ्या उमेदवारांवर पुढील ६ वर्षासाठी निवडणूक लढवण्यास बंदी घातली जाणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. नगरपालिका निवडणुकीत उमेदवाराचा विजय झाला असो किंवा

पान २ वर

**३० दिवसांची आहे मुदत**

बीड नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला मतदान पार पडले होते, तर २१ डिसेंबरला मतमोजणी झाली. नियमानुसार, मतमोजणीच्या तारखेपासून (२१ डिसेंबर) ३० दिवसांच्या आत खर्चाचा अहवाल देणे आवश्यक आहे. जे उमेदवार विहीत मुदतीत खर्च सादर करणार नाहीत, त्यांना लोकप्रतिनिधी कायद्यानुसार पुढील सहा वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास अपात्र ठरविले जाऊ शकते.

# अजब टॉसची चर्चाच चर्चा

### 'ईश्वर चिठ्ठी' उघडली अन् एमआयएमचा उमेदवार थेट निवडणुकीच्या रिंगणाबाहेर

अकोला । दिव्य वार्ता ।

राजकारण म्हटलं की चुरस, ईर्षा आणि एकमेकांचे पाय खेचणे आलेच! पण अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत एक असा 'क्लायमॅक्स' पाहायला मिळाला, जो पाहून भलेभले राजकीय विश्लेषकही चक्रावून गेले आहेत. प्रभाग क्रमांक १६ मध्ये रंगलेलं हे नाट्य कोणत्याही सस्पेन्स थ्रिलरपेक्षा कमी नव्हतं. येथे दोन तगड्या उमेदवारांच्या नशिबाचा फैसला चक्क ' ईश्वर चिठ्ठी 'ने झाला आणि एका उमेदवाराला हसत-हसत माघार घ्यावी लागली.



जेव्हा 'मतांचे गणित' आणि 'समाजहित' आमनेसामने आले. प्रभाग १६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि एमआयएम (चखच्) या दोन्ही पक्षांनी शड्डू ठोकला होता. दोन्ही उमेदवारांची ताकद तोडीस तोड असल्याने 'काटे की टक्कर' निश्चित होती. मात्र, या लढतीत मुस्लिम मतांचे विभाजन होऊन तिसऱ्याचाच फायदा होईल, अशी भीती समाजधुरीणांना वाटू लागली.

पान २ वर

# इत्तेहाद फाउंडेशन बीड यांच्या तर्फे गरजूवंतांना शॉल व ब्लँकेट वाटप





बीड । दिव्य वार्ता ।

थंडीच्या वाढत्या प्रकोपामुळे गोरगरीब व गरजूवंत नागरिकांना दिलासा मिळावा या उद्देशाने इत्तेहाद फाउंडेशन, बीड यांच्या वतीने शॉल व ब्लँकेट वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा लाभ शहरातील तसेच परिसरातील अनेक निराधार, वृद्ध, मजूर व रस्त्यावर राहणाऱ्या गरजूवंत नागरिकांना देण्यात आला. हिवाळ्यात थंडीमुळे गरीब व असहाय्य लोकांचे हाल होऊ नयेत, यासाठी सामाजिक बांधिलकी जपत इत्तेहाद फाउंडेशनने पुढाकार घेतला. फाउंडेशनचे पदाधिकारी व सदस्य प्रत्यक्ष गरजू लोकांपर्यंत जाऊन शॉल व ब्लँकेटचे वाटप केले. या वेळी लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद दिसून येत

पान २ वर

# जिंतूर शहराचा सर्वांगीण विकास हाच ध्यास -नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख प्रतिपादन

जिंतूर । दिव्य वार्ता ।

येथील नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर माझ्यावर नागरिकांनी व नगरसेवकांनी जो विश्वास टाकला आहे, त्या विश्वासास पात्र ठरण्यासाठी प्रामाणिकपणे व कटिबद्धतेने काम करणार असल्याचे प्रतिपादन नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख यांनी केले.शुक्रवारी(दि०२ जानेवारी ) दुपारी ३ वाजता नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पदग्रहण सोहळ्यासाठी कार्यक्रमाला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी उमेश ढाकणे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वसंतराव शिंदे, गटनेते सचिन ऊर्फ मुन्ना गोरे, शिंदे, ऍड विजयराव देशमुख, रविराज



देशमुख,भाजप तालुका अध्यक्ष गोविंद थिटे,डॉ.पंडित दराडे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक,पदाधिकारी व शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रतापराव देशमुख म्हणाले की, सन २००७ - ०८ मध्ये नगराध्यक्ष

पान २ वर

# मिल्लीया महाविद्यालयात दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

### शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया-संचालक डॉ.सुधाकर शेंडगे

बीड । दिव्य वार्ता ।

येथील मिल्लीया कला, विज्ञान व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन प्लेसमेंट या विषयावर दिनांक १ व २ जानेवारी २०२६ रोजी कार्यशाळा घेण्यात आली.

दि. १ जानेवारी २०२६ रोजी कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. सुधाकर शेंडगे (संचालक ,आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,




छत्रपती संभाजीनगर) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहम्मद इलयास फाजिल, उपप्राचार्य प्रोफेसर हुसैनी एस एस, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी

पान २ वर

# जात वैधता समितीच्या आदेशास उच्च न्यायालयाची स्थगिती



**समरीन बेगम सय्यद फारुख यांच्या राजकीय भवितव्याला तात्पुरता दिलासा**

परभणी । दिव्य वार्ता ।

परभणी शहर महानगरपालिकेच्या सन २०१७ मधील सार्वत्रिक निवडणुकीत वार्ड क्रमांक १६ मधून राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या नगरसेविका समरीन बेगम शब्बीर खान ऊर्फ समरीन बेगम सय्यद फारुख यांना उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हाजात प्रमाणपत्र पडताळणी समिती, परभणी यांनी दि. ११ ऑगस्ट २०२३ रोजी पारित केलेल्या जात वैधता नाकारणाऱ्या आदेशास मा. उच्च न्यायालयाने पुढील अंतिम निर्णय होईपर्यंत स्थगिती दिली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, समरीन बेगम या सन २०१७ मध्ये परभणी महानगरपालिकेच्या निवडणुकीत राखीव प्रवर्गातून निवडून आल्या होत्या. त्यावेळी तत्कालीन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, परभणी यांनी त्यांना वैधता प्रमाणपत्र दिले होते. मात्र सदर वैधता प्रमाणपत्रास शांताबाई चव्हाण यांनी उच्च न्यायालयात याचिका क्रमांक २०८७/२०२० द्वारे आव्हान दिले होते. या याचिकेवर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने प्रकरणाची पुनःचौकशी करण्याचे आदेश देत ते जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे वर्ग केले होते.

यानंतर जात वैधता समितीने पुनःचौकशी करून दि. ११/०८/२०२३ रोजी नवीन आदेश पारित करत समरीन बेगम यांच्या जात वैधतेचा दावा नाकारला. या आदेशाविरोधात समरीन बेगम यांनी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका क्रमांक १३३५३/२०२३ दाखल केली. ही याचिका ॲड. महेश देशमुख यांच्यामार्फत दाखल करण्यात

पान २ वर

# अलहुदा उर्दू हायस्कूल बीडची नळदुर्ग किल्ल्यावर शैक्षणिक सहल


### इतिहास प्रत्यक्ष अनुभवातून उलगडला

बीड । दिव्य वार्ता ।

शहरातील नूर एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटीद्वारा संचलित अलहुदा उर्दू हायस्कूल, बीड येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासाच्या उद्देशाने यावर्षीही शैक्षणिक सहलीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच इतिहास व सांस्कृतिक पुरातन वारशाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची सुवर्णसंधी मिळाली.

शाळेतील इयत्ता आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची एकदिवसीय शैक्षणिक सहल ऐतिहासिक नळदुर्ग किल्ला, तालुका तुळजापूर, जिल्हा धाराशिव (उस्मानाबाद) येथे पार पडली. सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी किल्ल्याची भव्य तटबंदी, दरवाजे, बुरुज, जलव्यवस्था व संरचनात्मक वैशिष्ट्यांची बारकाईने पाहणी केली. तसेच नळदुर्ग किल्ल्याच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीविषयी, त्याच्या

पान २ वर





# वडवणी वकील संघाच्या उपाध्यक्षपदी ॲड.के.डी काळेंची बिनविरोध निवड

वडवणी । दिव्य वार्ता ।

वडवणी वकील संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये वडवणी न्यायालयात हुशार विधीज्ञ म्हणून काम करणारे के डी काळे साहेब यांची उपाध्यक्षपदी सर्वानुमते बिननिरोध निवड करण्यात आलेली आहे.

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील रहिवासी शेतकरी कुटुंबातील व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन एलएलबी पदवी प्राप्त करून वडवणी न्यायालयात हुशार मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे भारत सरकार नोटरी प्राप्त विधीज्ञ केडी काळे यांनी वडवणी येथील संघाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये उपाध्यक्ष पदाकरिता उमेदवारी अर्ज दाखल केलेला होता . यामध्ये त्यांनी आत्तापर्यंत वडवणी वकील संघासाठी तळमळीने केलेल्या कामाची पावती म्हणून तसेच वकिलांच्या सदैव कोणतेही अडचणीमध्ये व कामांमध्ये अग्रेसर असणारे काळे यांची वकील संघाच्या सर्व पदाधिकारी सदस्य यांनी उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड केलेली आहे तरी काळे यांची वकील संघाच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल वडवणी शहरासह तालुक्यात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. वकील संघाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल वकील संघाचेवतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०